
Vol. 5 | 1st July, 2019 (Monthly) | Price: ₹100/- | Total Pages: 36

चिकूPiku.com

Fun & Learning



For Kids & Parents

1 to 8 Years

Brain-based Nurturing for Early Childhood.
Stories & Activities in मराठी & English Languages.



चिकूपिकू.com
Fun & Learning

लहान मुलांचं टीव्ही आणि मोबाईलचं आकर्षण दूर करुयात!

१ ते ८ वयोगटातील मुले व त्यांच्या पालकांसाठी मासिक

चिकूपिकू – दोन भाषांत का?

'मेंदूमध्ये अनेक भाषा शिकण्याच्या यंत्रणा आहेत. मूल अनेक भाषा शिकू शकतं.' असं भाषातज्ज्ञ नोम चोम्स्की यांचं संशोधन सांगतं. सहजपणे, अगदी नैसर्गिक वातावरणात ज्या भाषा कानावर पडतील त्या मुलांना येतात. मातृभाषा ही त्याची पहिली भाषा असते. १ ते ८ वयोगटातील मुलं मातृभाषेत विचार करून, त्यांच्या भावना चांगल्या प्रकारे व्यक्त करू शकतात. आज मुलांना इंग्रजी शिकणंसुद्धा अपरिहार्य झालं आहे. म्हणून हा अंक मराठी आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषांमध्ये आहे.

मराठीतून गोष्टी कशासाठी?

१ ते ८ या वयोगटातल्या मुलांचा भाषाविकास फार जोमाने होत असतो. बाळ जन्मापासून आईची भाषा ऐकत असतं. घरातील, परिसरातील भाषा ऐकत असतं. या भाषेशी त्याची विशेष जवळीक (connect) असते. मुल इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जात असले तरी मातृभाषेत सांगितलेल्या गोष्टींमुळे भावनिक विकास साधला जातो. हे लक्षात घेऊन अंकातल्या बहुतेक गोष्टी मराठी भाषेत आहेत. यातून त्यांना नवे शब्द माहीत होतात.

चिकूपिकू आणि Multiple Intelligence

डॉ. हॉवर्ड गार्डनर यांच्या Theory of Multiple Intelligences या जगप्रसिद्ध सिद्धांतातील तत्व पानोपानी दिसतील. पालक किंवा शिक्षकांनी या activities करून घेतल्या तर मुलांमधल्या आठ बुद्धिमत्तांपैकी प्राधान्य बुद्धिमत्तांचा शोध पालकांना नक्कीच लागेल.



ChikuPiku team of experts: **Dr. Shruti Panse** (Educationist) | **Abha Bhagwat** (Artist- Wall art painting)
Dharmaraj Patil (Ornithologist) | **Vaidehi Ashtaputre-Kulkarni** (Storyteller)
Vaishali Karlekar (Author) | (An enthusiastic team of illustrators & artists |

Owned & Published by OneZeroEight Learning Pvt. Ltd. | **Editor**: Dr. Shruti Panse
Printed by Atharva Print Creation, S. No. 91/1, Plot No. 8, Tulshibaugwale Colony, Sahakar Nagar, Pune 411 009
Published at Flat No. 10, Narayan Complex, 2nd Floor, Hingne Kh., Sinhgad Road, Pune 411 051

प्रिय आई-बाबा,

चिकूपिकूचा हा पाचवा अंक. हा अंक काय आहे, याची कल्पना आता तुम्हाला आली असेल. आपण मुलांना जवळ घेऊन, मांडीवर बसवून गप्पा मारतो. एकमेकांच्या कानात काहीतरी गमती-जमती सांगतो. वय आणि पद विसरून मुलांशी 'काय वाट्टेल ते खेळतो, फिरायला जातो या सगळ्याचा खूप चांगला परिणाम मुलांच्या मनावर, मेंदूवर, भावनिक व सामाजिक बुध्दिमत्तेवर होणार आहे. आई-बाबांशी असलेलं नातं जास्त घट्ट होणार आहे. म्हणूनच हा अंक मुख्यत: आई-बाबा आणि मुलांचा अंक आहे.

ज्या शाळांमध्ये आवर्जून हा अंक वापरला जातो, यातल्या गोष्टी वाचून दाखवल्या जातात, त्या मुलांना आणि शिक्षकांना गोष्टी आणि activities आवडत आहेत, हे जेव्हा शिक्षक सांगतात तेव्हा मुलांच्या बौध्दिक आणि भावनिक विकासाची त्यांना कळकळ आहे याची पावती आम्हाला मिळते.

अंकाबरोबरच www.chikupiku.com या ७ ते ८ वयातल्या मुलांसाठीचा platform दिवसेंदिवस बहरतो आहे. मुलांना गोष्टी ऐकता येतील अशी सोय यात आहे. मात्र ही वेबसाईट मुलांना दाखवण्यासाठी नाही, तर ऐकवण्यासाठी आहे हे लक्षात घ्या.

अंकाला मिळालेला छान प्रतिसाद बघून या platform वर बौध्दिक विकासासाठी योग्य अशी खेळणी आणलेली आहेत. त्याचबरोबर नवी पुस्तकं लवकरच आणत आहोत. मुलांचा स्क्रीन टाईम कमी व्हावा आणि त्यांच्या बौध्दिक प्रक्रियांना योग्य वळण लागावं यासाठी हा सगळा प्रयत्न आहे. यात तुमची साथ मिळते ही महत्वाची गोष्ट आहे.

डॉ. श्रुती पानसे

Editor - ChikuPiku
Ph.D. (Brain-Based Learning)
Educationist | Consultant | Child Psychologist
www.shrutipanse.com



Linguistic / Verbal Intelligence

चिकू Piku
जंगलाच्या सहलीला

मिकू तिच्या मावशीकडे रहायला गेली होती. ती नसल्यामुळे चिकू, पिकूला दोघांतच खेळण्याचा कंटाळा आला.






चिकू आणि पिकूची स्वारी जंगलाकडे जायला लागते. पिकू उडत तर कधी चिकूच्या पाठीवर बसून जात असते.

थोडा वेळ चालल्यावर जंगल सुरु होतं.

जंगल बघून दोघंही खूष होतात. उड्या मारत, फुलपाखरांशी पकडापकडी खेळत ते पुढे जातात.

या चित्रात किती फुलपाखरं आहेत सांग बरं?





मग पिकू चिकूला
सुगरण पक्ष्याचं
घरटं दाखवते.

मधमाश्यांचं पोळं दाखवते.





आणि चिकू पिकूला
मुंग्यांचं वारूळ व
कोळ्याचं जाळं दाखवतो.



तेवढ्यात एक ससा चिकूजवळ येतो. त्याचं नाव असतं ससू.
ससूला सगळं जंगल माहीत असतं. मग तो त्यांना घेऊन खूप फिरतो.



Parents Zone

गोष्ट वाचून दाखवताना गोष्टीतली चित्रं मुलांना दाखवा. एकदा सांगितलेली गोष्ट मुलं चित्रांवरून स्वतः छान सांगू शकतात. चिकू पिकूनी जंगलात काय-काय पाहिलं? असे प्रश्नसुद्धा मुलांना विचारता येतील.

जंगल फिरता-फिरता संध्याकाळ झालेली असते. मग ते एका डोंगराच्या टोकाजवळ येतात.
तिथून चिकू आणि पिकूला मिकूचं घर दिसतं. त्यांना घराची खूप आठवण येते.



मग ससूला पण ‘आपल्या घरी सहलीला ये’ असं सांगून
दोघंही उड्या मारत घरी जातात.

– वैशाली कार्लेकर

खड्डा खणता–खणता चिकू खूप खोलवर गेला आहे. न रंगवलेले दगड रंगवून त्याला रस्ता शोधून दे बरं!

(इथे रंगांचा लाल–पिवळा, लाल–पिवळा असा पॅटर्न दाखवला आहे. तो ओळखून मुलांना तसेच रंग देता येतील.)



Do you know?
A worm has no arms, legs or eyes.

Spatial / Visual/ Intra personal / Logical Intelligence

माऊ आणि बाऊ

Audio story available on www.chikupiku/audio

माऊ ही दोन वर्षांची गोंडस मुलगी आहे.
या वयातल्या मुलांप्रमाणे ती थोडीशी हट्टी आहे.
तिच्या शेजारी साहिल नावाचा मुलगा राहतो.
साहिल रोज माऊच्या घरी खेळायला येतो.
साहिलदादाच्या सगळ्या गोष्टी माऊ कॉपी करते.











Problem Solving / Awareness of Hygine


गोल-गोल

–उमा बापट
Psychologist, Facilitator & Writer
Founder - बाल्यधून


Audio poem available on www.chikupiku/audio

गोल-गोल चेंडू, उंच उडवला,
गोल-गोल चांदोबा, ढगामागे लपला,



गोल-गोल बांगडी, हातात घातली,
गोल-गोल टिकली, आईला लावली,

गोल-गोल-गोल, गोल गोलात गिरकी,
गोल-गोल गोळी, सगळयांनी खाल्ली,



Musical Intelligence

(उमा बापट यांनी हे गाणं २००८ मध्ये गरवारे बालभवन, पुणे आयोजित **'आईचे शेपूट'** या उपक्रमासाठी रचले आहे. १.५ ते ३ वर्ष वयातील मुले व पालक यांनी एकत्र खेळायचे हे शिबीर आहे. गेली १२ वर्ष हे गाणं आईचे शेपूट या शिबिरात अनेक मुलांनी आणि पालकांनी म्हटलेले आहे)


पालकांसाठी

प्रिय आई–बाबा / आजी–आजोबा / मावशी–मामा / ताई–दादा,

- आपण शब्द आणि संकल्पना यातला फरक लक्षात घ्यायला हवा. गोल, वर्तुळ हे सगळे शब्द झाले. गोलाकार, गोलपणा, वर्तुळाकार ही संकल्पना झाली!
- अमूक एका वस्तूलाच 'गोल' म्हणतात, का या वस्तूचा आकार गोल आहे, हे मुलांना हळूहळू उलगडत जाऊ शकतं.
- मुलं गोल ही संकल्पना शिकत असताना अनेक वस्तू दाखवून ती स्पष्ट होऊ शकते. गाण्यामध्ये काही वस्तू सांगितल्या आहेत.
- चेंडूचे चित्र दाखवून गोल शिकवला तर, गोल का चेंडू? असा गोंधळ मुलं करु शकतात पण तो समजून घेण्यातला टप्पा आहे.
- गोलाकारचा अनुभव मुलांना गिरकीतून देता येईल.

गोलापासून तयार केलेले चेहेरे तू पण काढून बघ!

Visual / Spatial Intelligence




मिनूचा वाढदिवस होता. आई तिच्यासाठी हाताने वळून गुलाबजाम तयार करत होती.







बांगडी


गोल पोळी


पंखा गोल फिरतो


डब्याचं झाकण


चेंडू

तुला आवडणाऱ्या गोल खाऊचं नाव सांग बरं!

तुझ्या घरात अजून कुठे गोल दिसतो. शोध बरं? (मुलांना गोल गोष्टी शोधायला सांगा)

शोध आणि सांग

या वारुळात कोणता प्राणी राहत असेल बरं? त्या प्राण्याची छोटीशी खूण चित्रातच आहे. खाली दिलेल्या जागेत या प्राण्याचं मस्त चित्र काढ आणि रंगव!



Naturalistic / Visual / Spatial Intelligence

हे चित्र आम्हाला Whatsapp वर पाठवा.
91721 36478

Nature and मी

Dharmaraj Patil
(Ornithologist / Wildlife Researcher)

माझी सोंड म्हणजे माझं नाक. सोंड मी कशीही वळवू शकतो. तू तुझं नाक हलवू शकतोस का? सोंडेने मी वास घेऊन माझा खाऊ म्हणजे गवत, पानं, फळे शोधून काढतो. अगदी दूरवरचं (१० ते १२ मैलावरचं) पाणीसुध्दा माझी सोंड शोधते बरं का! सोंडेत मी एका वेळेस १२ ते १५ लिटर पाणी ओढून घेतो आणि तोंडात घालून पितो. सोंडेनेच मी मस्त अंघोळ करतो. आणि कुणी मला त्रास दिला तर सोंडेनेच त्याला फटकावतो.



हत्ती



आपलया नाकाने आपण श्वास घेतो. रस्त्यावरून जाताना पाव-भाजी आणि पाणी-पुरीचा वास आपलयाला नाकानेच येतो.

माझं नाव जरी खवल्या मांजर असलं तरी मी मांजर नाहीये बरं का! माझंसुध्दा नाक खूप स्ट्राँग आहे. मुंग्या आणि वाळवी हे माझं जेवण मी नाकानेच वास हुंगत शोधून काढते. मुंग्या चावू नयेत म्हणून माझ्या अंगावर खवले आहेत.





माझं नाक खूप मोठ्ठं आहे. तुला माहितीये का? मी कुत्र्यापेक्षा जास्त चांगला वास हुंगून वस्तू शोधू शकतो. मी मुंग्या, वाळवी, मधमाश्यांची अंडी आणि मध हे सगळं खातो. माझा खाऊ मी नाकानेच शोधून काढतो. मुंग्या आणि मधमाश्या चावू नयेत, म्हणून माझ्या अंगावर भरपूर केस आहेत.



अस्वल



गिधाड

माझं नाक खूप स्ट्राँग आहे. मला निसर्गातला सफाई-कामगार म्हणतात कारण मी जंगलात, रस्त्यावर किंवा कुठेही पडलेले, मेलेले प्राणी-पक्षी खाऊन परिसर सफाचक ठेवतो. कुठे मेलेला प्राणी आहे, हे मी माझ्या नाकानेच शोधून काढतो. आम्ही आता नामशेष होण्याच्या मार्गावर आहोत. आज भारतात आमची संख्या पूर्वीच्या तुलनेत फक्त एक टक्का आहे.




खवले मांजर / Pangolin

Naturalistic Intelligence


Radha and her father are buying vegetables.
Find the below objects hidden in the right hand side picture.


Fish


Butterfly


Turtle


Teapot


Ball


Sock


Squirrel



Pot



Caterpillar

राधानं आंब्यांचा रस काढून मस्त आमरस बनवला.
खाली दिलेल्या चित्रांचा १, २, ३ असा क्रम लाव बरं.

Mathematical / Logical Intelligence



आंबे पिळून त्याचा रस काढला.


आंब्याचा रस तयार झाला.


आंबे धुतले.

SPOT SPOT

Picture Observation



Parents Zone

Show the pictures of Spidy the Spider & Ball given below. While reading the story, when the picture comes, ask the child name of the respective picture.



Spidy



Ball

is a big spider.

children playing with the

slowly held the .

threw the and imm

thought he would keep the

But then saw a small kid cry

the to the kid.

said happily

I have 8 eyes and 8 legs. My web is very strong
glass. Mosquitos, insects and flies get easily tra
can fit on the tip of a pencil and the largest spi

Spidy -The- Spider

has spun a big web on a tree in a garden. One day a got trapped into s web.

ediately caught it back with a web thread. liked playing with .

ging for the . felt bad for the kid.

bye bye

threw

th

had seen



g. Scientists believe it is stronger than bullet-proof
apped in my web and I eat them. The smallest spider
der can be as big as a dinner plate.

फिशिरा
लपाछपी

फिशिरा आणि तिचे मित्र एकदा लपाछपी खेळत असतात. फिशिरावर राज्य असतं. खूप वेळ होतो तरी तिला कोणालाच शोधता येत नसतं.

काय हे! मला किरो आत्ता इथेच दिसला होता. कुठे गेला तो?

मिलू... अरे कुठे गेली ही?

मला सगळे दिसतात,
पण तिथे गेले तर सापडत कसे नाहीत?
शी!! असं कसं? माझ्या एकटीवरच
किती वेळ राज्य आहे... मला नाही
खेळायचं... मी जाते निघून.

असं म्हणून फिशिरा जायला निघते. तितक्यात तिला किरो दिसतो.

ओह, तो तिथे किरो लपलाय.
हळूहळू जायला पाहिजे,
नाही तर तो पण निघून जाईल.

(फिशिरा जाऊन
किरोला आऊट करते.)



सगळे एकत्र जमतात.

हुश्शSSS! सुटलं एकदाचं राज्य.
पण मला एक सांगा, मी जवळ
आलेली तुम्हाला कळत कसं होतं?
माझ्या एकटीवरच कितीतरी
वेळ राज्य होतं...

तुला का
सांगू सिक्रेट?

ए मी सांगते गं तुला, हे बघ आपण
सगळे समुद्रात पोहत असलो तरी
प्रत्येकाचं पोहणं वेगवेगळं असतं.
पाण्याची हालचाल कशी होते, यावरून
समजतं, कोण कुठून आलं ते.


ऑक्टी पोहताना पाण्यात
वेगवेगळे बुडबुडे येतात.

मी पोहताना,
पाणी वेगळं हलतं.

आणि टम्पू बघ!
तो पोहताना पाणी अजून
वेगळं हलतं


Parents Zone

गोष्टी ऐकून आणि वाचून मुलांना
नवे शब्द कळतात. खेळताना मुलांची भांडणं
होतात. फिशिरासारखं न चिडता, समजून
घेऊन खेळलं पाहिजे हे तुम्ही या गोष्टीच्या
आधारे सांगू शकता.


फिशिरा, तू तर खूप जोरात येतेस, त्यामुळे पाण्यात खूप तरंग येतात. आणि आम्हाला लगेच कळतं तू आलीयेस म्हणून.
असं होय! आता मी पण जरा डोक्याने खेळेन, सावकाश पोहेन आणि तुम्हाला बरोबर पकडेन.

– डॉ. श्रुती पानसे

Connect the dots and colour the picture.




Spatial Intelligence

Fishira is searching Kiro. Kiro is hiding behind a rock.
Can you help Fishira to reach Kiro?





रविवार होता तरीसुद्धा छबीचे कोणीच मित्र-मैत्रिणी खेळायला आले नव्हते. ती अगदीच कंटाळून गेली होती. छबी आजीला म्हणाली,



"आजी-आजी
मला आलाय कंटाळा खूप.
मी काय करू आता
सांग ना गं तूच..."

आजी म्हणाली, "कंटाळा आलाय? मग माझं एक काम करशील का? हे बघ, हे पुस्तक मी पत्की आजोबांकडून म्हणजे तुझ्या बागुलबुवाकडून आणलं होतं. तू ते त्यांना परत करून येतेस? जवळच राहतात ते." छबी आनंदाने हो म्हणते आणि पुस्तक घेऊन बागुलबुवाकडे जाते.



Audio story available on www.chikupiku/audio

छबी बागुलबुवाच्या घरी पोहोचते. छबीला बघून बागुलबुवा म्हणतो, ''अरेच्या! आज आमच्या छबूताई इकडे?''

छबी म्हणते ''हो, आजीने तुझं पुस्तक द्यायला सांगितलं, म्हणून आले. आज शाळेला सुट्टी. पण कोणीच नाहीये खेळायला त्यामुळे खूप कंटाळा आलाय.''


बागुलबुवा म्हणाला, ''अरे बापरे असं झालं तर! मग कंटाळा आला तर पुस्तक वाचायचं, त्यातली चित्रं बघायची, खूप धमाल असते त्यात.''

छबी म्हणते, ''हो? मला दाखव की असं धमाल पुस्तक!''

बागुलबुवा म्हणतो, ''ये इकडे, आज माझ्या पिशवीतल्या जादूच्या पुस्तकाची सैर करूया!!''

छबी आणि बागुलबुवा मग एकत्र जादूचा मंत्र म्हणतात.

''चिंग-चिंग चू, चिंग-चिंग चू,
जादूच्या पुस्तका आम्हाला आत घे तू...''



आणि काय गंमत! ते दोघं जादूच्या पुस्तकात जातात आणि बघतात तर काय, सगळे प्राणी पक्षी जंगलात गाणं गात असतात.




''आम्ही सारे प्राणी-पक्षी,
मिळूनी गाती-मिळूनी राहाती.''

''पुस्तकांच्या पानांतून
गंमत-जंमत दाखवती.''



छबी म्हणते, ''बागुलबुवा इकडे किती गंमत आहे, पुस्तकातले प्राणी-पक्षी किती मस्त धमाल करताएत. अरे बापरे! केवढं मोठ्ठं झाड आहे ते! आणि त्याच्यावर अक्षरं आहेत. अशीच अक्षरं असतात ना पुस्तकात? बागुलबुवा, मी आलेच ते झाड बघून!'' छबी अक्षरांच्या झाडाजवळ जाते.






तिथे एक हरीण गवत खात असतं. छबीला बघून ते हरीण उड्या मारत पळून जातं. छबी त्याच्या मागे पळते. ती इतकी पुढे जाते की पुस्तकांच्या पानांमध्ये हरवते. छबीला भीती वाटायला लागते. इकडे बागुलबुवापण छबीला शोधतो पण छबी कुठेच सापडेना.

Musical / Verbal Intelligence

तेवढ्यात तिथे 'रुपा' नावाची हत्तीण येते आणि छबीला विचारते, ''कोण तू? तू इथं कशी काय आलीस?'' छबी सगळं सांगते. रुपा हत्तीण म्हणते, ''एवढंच ना? काही काळजी करू नकोस. मी शोधून देईन तुला बागुलबुवाचं पुस्तकातलं पान.'' छबीला आनंद झाला. रुपा हत्तीण म्हणते, ''ये छबी, बस माझ्या पाठीवर.''



मस्त डुलत-डुलत छबी आणि रूपा हत्तीण अक्षरांच्या झाडाच्या इथे येऊन पोहोचतात. छबी म्हणते, ''रूपा, तो बघ बागुलबुवा!'' रूपा हत्तीण सोंड वर करून छबीला टाळी देते. छबी बागुलबुवाकडे पळत-पळत जाते आणि घडलेलं सगळं सांगते. बागुलबुवा छबीला शूर म्हणतो आणि रूपा हत्तीणीलापण शाबासकी देतो.


बागुलबुवा म्हणतो, ''आता पुस्तकातून बाहेर जायची वेळ झाली आहे, टाटा रूपा हत्तीणी.''

''चिंग-चिंग चू, चिंग-चिंग चू,
जादूच्या पुस्तका आम्हाला बाहेर आण तू!''

बागुलबुवा आणि छबी जादूच्या पुस्तकातून बाहेर येतात. छबी म्हणते, ''बागुलबुवा पुस्तकात किती धमाल असते. कंटाळा पळून गेला माझा. मी आता सगळ्या प्राण्यांना गोष्टीतून भेटणार.'' बागुलबुवा हसत-हसत तिला सांगतो, ''रविवारी, आजारी असताना खेळायला कोणी नसताना कंटाळा आला की काय करायचं?''

''पुस्तक हातात घेऊया, गमती-जमती वाचूया.
प्राणी-पक्षी-परीताई, असतात सगळे पुस्तकात भारी.
रंगीत चित्रं बघूया, पुस्तक हातात घेऊया.
कंटाळा आपला घालवूया, पुस्तक हातात घेऊया.''

- वैदेही अष्टपुत्रे-कुलकर्णी







How to Draw a Bear?

Spatial Intelligence


Follow these simple steps to draw a Bear.




1




2



3



4



5



6

हे चित्र आम्हाला Whatsapp वर पाठवा.

91721 36478

चिमणी चित्र

-आभा भागवत

Visual Intelligence



आवर्जून काय कराल

रंग एकत्र करून नवा रंग तयार होताना बघणं ही लहान मुलांच्या दृष्टीने जादू असते. मुलांना असे वेगवेगळे रंग एकत्र करून बघायच्या संधी उपलब्ध करून द्या!



काय करू नका

मूल जर रंगकामातच जास्त रमत असेल तर अजून वर्तमानपत्र द्या. मुलांना थांबवू नका. एकच कागद मिळेल या बंधनात अडकवू नका.



पालकांसाठी

चित्रकला म्हणजे लहान मुलांसाठी खेळच असतो. त्यात जेवढ्या वैविध्यपूर्ण कृती येतील तेवढी मुलांना मजा येते आणि मुलं सहज जास्त काळ त्यात रमतात. शेजारी दिलेली activity मुलांसोबत तुम्हीही करून बघा. या activity मध्ये वर्तमानपत्रासारखा साधा प्रिंटेड कागद रंगवणे, दोन रंग एकत्र करून नवा रंग तयार करणे, मोठ्या ब्रशने रंगकाम, चित्र वाळू देणे, मग ते हाताने फाडणे आणि नव्या कागदावर नवं चित्र तयार करताना चिकटवणे अशा अनेक कलात्मक कृती केल्यामुळे वेगळाच आनंद मिळतो. यात छोटी छोटी वेगळीच सौंदर्यात्मक आव्हानं मुलं सहज पेलायला शिकतात.

प्रत्येक कृती ही सुंदर प्रक्रिया आहे. ती मुलांबरोबर पालकांनीही अनुभवावी आणि मजा घ्यावी. यातूनच सर्जकता वाढीला लागते.

वर्तमानपत्रासारखं साधं साधन वापरायला मुलं यातून सहज शिकतील. कागदांचा पुनर्वापर करून पर्यावरणीय संदेशही सहज समजतो. चित्र काढायला नेहमी महाग साधनांची गरज नसते, हे आवर्जून मुलांशी बोला.



मुलांसोबत ही Activity करून पहा!

साहित्य - वर्तमान पत्र, आवडते कुठलेही २ पोस्टर कलर्स, रंग कालवायला वाट्या, मोठे ब्रश, डिंक, कोरा कागद.

काय करायचं - वर्तमानपत्र फाडून त्याचा एक चतुर्थांश भाग घे. आवडीचे दोन पोस्टर कलर्स दोन वाट्यांमध्ये काढून घे. तिस-या वाटीत ते दोन्ही रंग एकत्र करून कुठला रंग तयार होतो हे करून बघ. मोठ्या ब्रशने तीनही रंग वापरून वर्तमानपत्रावर हवं तसं रंगव. आता हा कागद वाळायला ठेव. पूर्ण वाळला की हाताने फाडून हवे तसे तुकडे कर. हे तुकडे दुस-या एका पांढ-या कागदावर डिंकाने चिकटवून नवं चित्र तयार कर. हे झालं मस्त कोलाज तयार!

१ वर्तमानपत्राचा तुकडा घेऊन रंगवा.



२ रंगवलेले वर्तमानपत्र वाळवा.






३ वर्तमानपत्राचे हाताने तुकडे करून कोलाज तयार करा.



Curious CUBO

The Moon Is Following Us

One day Cubo had gone to meet his cousin, while on his way back home, he looked outside of the car's window.





After he reached home,
he asked his Baba about the moon.

Baba, whenever we are travelling by vehicle; trees, people and other things get left behind? But the moon always follows us wherever we go. How does he manage to run with us everywhere?



Audio story available on www.chikupiku/audio





It depends on how far we are from the objects. Let's say we are passing by a tree. First, you will see it in front of the car. Then to the side of the car and then it's behind you.



Cubo, can you guess how far away the moon is from us?





As far away as the neighbouring city?

Intra personal / logical intelligence

Actually, it is almost 3,84,000 km. away. Which is really very far-far away. The distance between the moon & us is so great that the distance we are travelling is very small in comparison. So from whichever angle, we see the moon it seems to remain in the same place and we get the feeling that the moon is following us.



Ohh! That means we can never overtake him.

- Prajakta Kapure

Parents Zone

Don't ignore questions asked by children. In this story, we have tried to explain the concept of distance. You may need to elaborate it, to make the concept clear to your child.

My Corner



आशीर्वाद देणारा हनुमान आणि आकाशातून गाडी घेऊन जाणारा सांताक्लॉज.



शाळेत सांगितलेली गोष्ट ऐकून वेदांगने स्वतःच्या कल्पना वापरून काढलेलं चित्र.



झाडाच्या फांद्यांतून सी-सॉ कसा दिसेल याची एक कल्पना वेदांगने चितारली आहे.



वेदांग वाघमोडे

वेदांग वाघमोडे हा वॉलनट स्कूलमध्ये जातो. तो साडेचार वर्षांचा असून स्वतःच्या कल्पना चित्रांमधून व्यक्त करतो. गोष्टी ऐकून त्या गोष्टींचं चित्र काढणं त्याला आवडतं. घराच्या भिंतीवर आणि कागदावर अशा खूप गोष्टी त्यानं काढल्या आहेत.